शं.का.मु.-४०,००० पु. (२५ x ६)-०८-२०१०-ए ३-पि (वाय) ३५६

FORM - 1A

N.C.R.B.
I.I.F.-I 06

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1 राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. ३६ वर्ष Year २०१८ दिनांक Date २२/१०/१८

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.का १९८८ कलमे Sections १३(१)(इ) सह १३(२)

(ii) अधिनियम Act भादवि कलमे Sections १०९

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ....................

3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ........ तारीख पासून Date from ११/८/८८ वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to ७/४/१६ वेळ Time ........

3. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date २२/१०/१८ वेळ Time ११.वा

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ३७/१८ तारीख Date २२/१०/१८ वेळ Time १७.२५वा

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name ठाणे, रायगड ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road

जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

(a) नाव Name विनोद पवार (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name कृष्णा पवार

(c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age २९/१२/६२ (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ९८८७०३४२२७३

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी

(g) धर्म Religion जात Caste पोटजात Sub-Caste

(h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं ई ४०१ घर/नाव नंबर गोकुळ पार्क, डी मार्ट समोर, विरार (प.) जि.पालघर फोन/मो. नंबर पॅन नं. ओटर्स नं.
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.

रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो.स्टे P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

१) सुळकंद अविनाश दळवी, जकात निरीक्षक, बृ.म.न.पा., मुंबई
२) माधुरी सुळकंद दळवी (पत्नी)
रो हाउस ०५, पुरुषोत्तम रेसिडन्सी, कासार वडवली, घोडबंदर रोड, ठाणे

Scanned by CamScanner

यातील फिर्यादी श्री. विनोद कृष्णा पवार, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचा स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखीत केलेला जबाब हा गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Dmello
22/10/18

(कॅलिस्टस डिमेलो)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

[signature]

Scanned by CamScanner

फिर्याद  दि. २२/१०/२०१८

श्री. विनोद कृष्णा पवार, वय ५६ वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, सर पोचखानावाला मार्ग, वरळी, मुंबई..

—०००—

मी विनोद कृष्णा पवार, माहे जून २०१५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे एक टप्पा पदोन्नतीवर पोलीस निरीक्षक म्हणुन नेमणूकीस आहे.

***प्रकरणाची थोडक्यात हकीकत*** : दिनांक ०१/०५/२०१३ रोजी अर्जदार रहिवाशी ओम सोसायटी, एक्सर रोड, बोरीवली (प), मुंबई ४०० ०९१ यांनी गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी, जकात निरिक्षक, कर निर्धारण व संकलन विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई यांनी भ्रष्टाचाराच्या मार्गाने अपंसपदा संपादित केल्याची तक्रार केली आहे.

सदर तक्रार अर्जाची दखल घेवुन मा. वरिष्ठांच्या आदेशाने गुप्त चौकशी क्र. ७९/२०१३ अन्वये चौकशी सुरु करण्यात आली होती. सदर चौकशीचे चौकशी अधिकारी पो. नि. हरीलाल जाधव यांनी सादर केलेल्या अहवालावरुन सदर गुप्त चौकशी ही मा. महासंचालक, ला.प्र.वि. म.रा. मुंबई यांच्या आदेशान्वये दिनांक ०७/०४/२०१६ रोजी उघड चौकशी सुरु करण्यात आली. त्यानुसार गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी याचे मालमत्तेबाबत चौकशी सुरु करण्यात आली होती.

सदर उघड चौकशीची, चौकशी पो.नि.हरीलाल जाधव हे करीत होते, पो.नि. हरीलाल जाधव यांच्या बदलीनंतर दिनांक १८/०९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदरची उघड चौकशी आम्हाला वर्ग करण्यात आली होती.

नमूद उघड चौकशीचा परिक्षण कालावधी दिनांक ११/०८/१९९८ ते दिनांक ०७/०४/२०१६ असा निश्चित करण्यात आला. प्रस्तुत उघड चौकशीच्या करण्यात आलेल्या चौकशीवरुन, खालील बाबी निष्पन्न झाल्या आहेत.

गै. अ. गुलकंद दळवी यांनी चौकशीदरम्यान मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबतची दिलेल्या माहिती बाबत संबंधीत कार्यालये, वित्तीय संस्था, बॅका यांच्याशी पत्र व्यवहार करुन, त्यांच्याकडूनही माहिती प्राप्त करण्यात आली आहे. संबंधीत कार्यालय, वित्तीय संस्था, बॅका यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व श्री. दळवी यांनी दिलेली माहिती यांची चौकशी करुन त्याचा खुलासा प्रत्येक मालमत्ता, उत्पन्न व खर्चामध्ये करण्यात आलेला आहे.

**गैरअर्जदार गुलकंद दळवी व त्यांची पत्नी सौ.माधुरी दळवी यांच्याकडे असलेली मालमत्ता :—**

१) गैरअर्जदार हे जकात निरीक्षक म्हणून बृहन्मुंबई महानगर पालीकेच्या कांजूरमार्ग, मुंबई येथील कार्यालयात नेमणूकीस आहेत.

२) गैरअर्जदार गुलकंद दळवी यांनी ३०२, ओम को.ऑ.हौ.सो.लि., एक्सर रोड, एक्सर तलाव जवळ, बोरीवली, मुंबई सदरची सदनिका ५०४ स्के.फु.ची असुन श्रीमती. शोभना मधुकर प्रधान व श्री. अशोक मधुकर प्रधान यांच्याकडुन दि. १६/०४/२००३ रोजी रू. ६,००,०००/ खरेदी केली आहे. सदर फ्लॅटची नोंदणी फि व मुद्रांक शुल्क हे

समक्ष,

22/10/18

( कॅलिस्टस डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

रुपये ३९६८०/– असे एकूण रुपये ६,३९,६८०/– असून सदरची रक्कम ही गैरअर्जदार यांनी रुपये १,०५,०००/– रोखीने व उर्वरीत रुपये ४,९५,०००/– हे आयसीआयसीआय बँकेतून लोन घेवून श्री. प्रधान यांना दिली आहे.

३) गैरअर्जदार यांचे भाईदर खारी गावातील सदरनिका क्र. १०२, कुसुम महल, खारी, भाईदर पूर्व, जि. ठाणे सदरची जागा किंमत रु. ४,५०,०००/– खरेदी केली आहे

४) गैरअर्जदार यांची बोरीवली येथील जागा फ्लॅट नं. ६०४, ६ वा माळा, ओम को.ऑ.है. सोसायटी, लि., एक्सर रोड, एक्सर तलावाजवळ, बोरीवली (प), मुंबई ९२, सदरची जागा ही विकासक मे. श्रीजी कस्ट्रक्शन यांना सदर जागेचे पुनर्वसन करताना त्यांचा पुर्विचा फ्लॅट क्र. ३०२ हा विकासकास देवून व वाढीव जागेचे रुपये ८,००,०००/– विकासकास देवून सदरची जागा गैरअर्जदार यांनी १२/०९/२०११ खरेदी केली आहे.

५) गैरअर्जदार यांची पत्नी नामे सौ. माधुरी गुलकंद दळवी यांनी रायगड जिल्हयातील तळा तालुक्यात चार ठिकाणी महेश राजाराम कुकरेजा यांच्यासह भागिदारीत जागा घेतल्या असून त्यांची एकूण किंमती २२,९७,५०४/– एवढी असून त्यात गैरअर्जदाराची पत्नीचा हिस्सा अर्धा असल्याने त्यांची किंमती रुपये ११,४८,७५२/– आहे.

६) गैरअर्जदाराने त्यांच्या पत्नी नामे सौ. माधुरी गुलकंद दळवी यांचे नावे रो हाऊस ०५, पुरुषोत्तम रेसिडन्सी, कासारवाडवली, घोडबंदर रोड, ठाणे ही ८२,०४,२५८/– रक्कमेस दिनांक ०२/०४/२०१३ रोजी घेतला आहे. सदरची मालमत्ता ही गैरअर्जदार यांनी त्यांचा बोरीवली येथील फ्लॅट विकून त्याव्दारे मिळालेल्या रकमेतून खरेदी केला आहे.

७) उघड चौकशीमध्ये गैरअर्जदाराची पत्नी माधुरी गुलकंद दळवी व मुलगी नामे दुर्वा गुलकंद दळवी यांची कार्पोरेशन बँकेमध्ये बचत खाती असुन सदर बँकेत मोठया रक्कमाचे व्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

८) दि. १२/०५/२००३ रोजी गैरअर्जदार दळवी यांचे कॉर्पोरेशन बँक खाते क्र. एसबी/०१/०३२३४८ या खात्यावर रुपये ४५,०००/– रोखीने भरलेले असून गैरअर्जदार व त्यांचे पत्नीचे नावे संयुक्त असलेल्या आयसीआयसीआय बँक खाते क्र. ००३२०१०२३६४७ या खात्यावर दिनांक ०१/०४/२००५ पासुन दिनांक ०८/११/२०१४ या कालावधीत रू. १०,०००/– त्यापेक्षा अधिक रक्कमा असे

समक्ष,
22/10/18
( कॅलिस्टस डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

एकुण रुपये ११,६८,९००/– एवढी रक्कम रोखीने भरलेल्या असल्याने निष्पन्न झाले आहे.

९) गैरअर्जदार यांची पत्नी नामे माधुरी दळवी यांनी त्यांचे कॉर्पोरेशन बँक, दादर, मुंबई या खात्यात दिनांक ०२/०४/२०१३ रोजी रुपये ४६२०००/– रोखीने भरुन त्याच दिवशी स्टॉक होल्डींग कॉ. ऑफ इंडिया यांना रू. ४,६३,०००/– ची रक्कम ट्रान्सफर केली आहे. सदरबात स्टॉक होल्डींग कॉ.ऑफ इंडिया यांच्याकडे पत्र व्यवहार करुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांच्याकडे गैरअर्जदार व त्यांची पत्नी यांचे नावे कोणतेही खाते नसल्याची लेखी माहिती त्यांनी दिली आहे.

१०) गैरअर्जदार गुलकंद दळवी यांनी पत्नी माधुरी दळवी यांचे नावे कासरवडवली,जि.ठाणे येथे रो हाऊस खरेदी करण्यात आला.सदरची रक्कम ही गैरअर्जदार व त्याची पत्नी यांचे नावे असलेल्या आयसीआयसी बँक, शाखा दादर, मुंबई या शाखेत सयुक्त खाते असलेल्या बँकेतुन आर्थिक व्यवहार केला आहे. तसेच गैरअर्जदार यांनी सदची मालमत्ता स्वत:च्या नावे निष्पन्न होवुन नुकसान होवु नये म्हणुन पत्नीच्या नावे मालमत्ता रू.८२,०४,२५८/– रक्कमेस खरेदी केली आहे.

गैरअर्जदार श्री. गुलकंद अविनाश दळवी जकात निरीक्षक (बृहन्मुंबई महानगर पालीका कर्मचारी वर्ग–३ कांजूरमार्ग, मुंबई यांचा दिनांक ११/०८/१९९८ ते दिनांक ०७/०४/२०१६ या परिक्षण कालावधीतील उत्पन्नाचा तपशिल.

—: उत्पन्न :—

| अ.नं | तपशिल | | | | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | वर्षे/सन | वेतन | आयकर वजाती | स्थुल वेतन | |
| १. | सप्टेंबर १९९८ ते मार्च १९९९ | ५१२४३ | ० | ५१२४३ | २१,०७,३९७/– |
| | एप्रिल १९९९ ते मार्च २००० | ८७४४६ | २०५ | ८७२४१ | |
| | एप्रिल २००० ते मार्च २००१ | ९१४८७ | ० | ९१४८७ | |
| | एप्रिल २००१ ते मार्च २००२ | ८१८३१ | १६०० | ८०२३१ | |
| | एप्रिल २००२ ते मार्च २००३ | १०४७९८ | २५०० | १०२२९८ | |
| | एप्रिल २००३ ते मार्च २००४ | १०२१८१ | ३६१४ | ९८५६७ | |
| | एप्रिल २००४ ते मार्च २००५ | १२१६६७ | ० | १२१६६७ | |
| | एप्रिल २००५ ते मार्च २००६ | १३८५५२ | ० | १३८५५२ | |
| | एप्रिल २००६ ते मार्च २००७ | १४७९६४ | ० | १४७९६४ | |
| | एप्रिल २००७ ते मार्च २००८ | १५८६३४ | ० | १५८६३४ | |

समक्ष

Dmello 22/10/18

( कॅलिस्टस डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एप्रिल २००८ ते मार्च २०११ | २४५९५० | ४४४० | २४१५१० | |
| | एप्रिल २०११ ते मार्च २०१२ | ३२९५२३ | २१२७३ | ३०८२५० | |
| | एप्रिल २०१२ ते मार्च २०१३ | १३४१५२ | ० | १३४१५२ | |
| | एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ | ४४१७१ | ० | ४४१७१ | |
| | एप्रिल २०१४ ते मार्च २०१५ | १५०४२८ | ० | १५०४२८ | |
| | एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ | १५१००४ | २ | १५१००२ | |
| | एकूण | २१४१०३१ | ३३६३४ | २१,०७,३९७ | |
| २ | गैरअर्जदार गुलकंद दळवी यांनी त्यांचे नावे खरेदी केलेला बोरीवली येथिल प्लॅट क्र ६०४, एक्सर रोड बोरीवली (प) मुंबई ९२ हा १) दिव्या महेंद्र झकाटीया व २) ओजस विनोदराय झकाटीया यांना ७५,००,०००/— किंमतीस विकला असून त्याबाबत श्री. झटाकीया यांच्याकडून धनादेशाव्दारे आलेली रक्कम ही गैरअर्जदार यांच्या आयसीआयसीआ बॅंकत खाते क्र. ००३२०१०२३६४७ या खात्यावर दिनांक १३/०२/१३, २७/०२/१३, २८/०२/१३, ०६/०३/१३, २२/०३/१३, ०४/०४/१३ रोजी जमा झाल्याचे त्यांच्या बॅंकेच्या स्टेटमेंटवरुन दिसून येते. | | | | ७५,००,०००/— |
| ३ | गैरअर्जदार गुलकंद दळवी यांनी दि.१५/०२/२००३ रोजी आयसीआयसीआय बॅंक,दादर शाखा,मुंबई या बॅंकेतुन गृह कर्ज घेतले आहे.. | | | | ४,९५,०००/— |
| | एकूण उत्पन्न | | | | १,०१,०२,३९७/— |

गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी जकात निरीक्षक (बृहन्मुंबई महानगर पालीका कर्मचारी वर्ग—३ कांजूरमार्ग, मुंबई यांचा दिनांक ११/०८/१९९८ ते ०७/०४/२०१६ या कालावधीतील खर्चाचा तपशिल.

—: खर्च :—

| अ.नं. | तपशिल | रुपये |
|---|---|---|
| १ | बोरीवली येथील ओम को.ऑ.हौ सोसायटी प्लॅट क्र. ३०२, एक्सर रोड बोरीवली (प) मुंबई ९२ येथील रुम खरेदी करता १६/०४/२००३ रोजी | ६,३९,६८० |

समक्ष,

22/10/18

( कॅलिस्टस डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | केलेला खर्च फ्लॅटची किंमत रु. ६०००००/— नोंदणी शुल्क ९०८०/— मुद्रांक शुल्क रु. ३०६००/— | |
| २ | बोरीवली येथील ओम को.ऑ.ही. सोसायटी फ्लॅट क्र. ३०२ हा जुना फ्लॅट बदली करून फ्लॅट क्र ६०४, एक्सर रोड बोरीवली (प) मुंबई ९२ येथील कम वाढीव जागेचा फ्लॅट खरेदी केला. सदर बाबत गैरअर्जदार यांची पत्नी नामे माधुरी दळवी हिचे कॉर्पोरेशन बॅंक खाते क्र.एसबी/०१/०३४०३७ या खात्यावरून दि.२४/०१/११ रोजी चेक क्र.००२३४६५ व्दारे रू. १,००,०००/— व चेक नं.००२३४६६ व्दारे रू.५०,०००/— तसेच दि. ०९/०३/२०१२ रोजी चेक क्र.०५९५६५९ रू.५,५०,०००/ व चेक क्र. ०५९५६६० रू. १,००,०००/— असे एकुण रू.८,००,०००/— धनादेशाव्दारे विकासक श्रीजी कंस्ट्रक्शन यांना दिले आहे. तसेच सदर कराराचे नोंदणी फि रू.१८,५६०/— व मुद्रांक शुल्क रू.७५,४०० असे एकुण रू. ८,९३,९६० | ८,९३,९६० |
| ३ | गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी यांचे एकूण उत्पनाचे ३३ टक्के खर्च (नाशाबित खर्च) :— गैरअर्जदार श्री. गुलकंद अविनाश दळवी यांचा ११/०८/१९९८ ते ०७/०४/२०१६ या कालावधीत ज्ञात स्त्रोत मार्गाने वेतनापोटी २१,०७,३९७/— एकूण वेतन प्राप्त झाले असून प्राप्त एकुण उत्पन्नाच्या ३३ टक्के ६९५४४१/— रू. घरखर्च गृहीत धरण्यात आला. | ६,९५,४४१ |
| ४ | गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी यांनी दि.१५/०२/२००३ रोजी आयसीआयसीआय बॅंक,दादर,मुंबई या बॅंकेतुन ४,९५,०००/— रक्कम मंजुर झाली होती व सदर गृह कर्जाची परतफेड (व्याज व दंडासह) रू. १०,६९,६९०/— केली आहे | १०,६९,६९० |
| ५ | गैरअर्जदार यांनी भाईंदर येथे सदनिका क्र. १०२, कुसुम महल, खारी, भाईंदर पूर्व येथे ०८/१०/२००२ मध्ये रुपये ४५००००/— खरेदी केली आहे. त्याचे नोंदणी शुल्क ४५००/— व मुद्रांक शुल्क ७२५०/— रक्कम | ११,७५० |
| | एकुण खर्च | ३३,१०,५२१ |

गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी यांचा दिनांक ११/०८/१९९८ ते ०७/०४/२०१६ या कालावधीतील मालमत्तेचा तपशिल.

—: मालमत्ता :—

| अ.नं. | तपशिल | रुपये |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार यांनी भाईंदर येथे सदनिका क्र. १०२, कुसुम महल, खारी, भाईंदर पूर्व येथे ०८/१०/२००२ मध्ये रुपये ४५००००/— खरेदी केली आहे. नोंदणी शुल्क ४५००/— व | ४५०००० |

समक्ष

( कॅलिस्टस डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | मुद्रांक शुल्क ७२५०/– रक्कम | |
| २ | गैरअर्जदार श्री. गुलकंद दळवी यांचे कॉर्पोरेशन बॅंक शिवाजी पार्क शाखा, बचत खाते क्र एसबी/०१/०३२३४८ मधील दिनांक ०७/०४/२०१६ रोजी असलेली बचत रु. ३३९४४/– व आयसीआयसीसीआय बॅंके दादर,मुंबई या बॅंकेतील शिल्लक रक्कम रू. १९/– बॅंकेतील शिल्लक रक्कम एकुण रू.३३९६३/–आहे. | ३३९६३ |
| ३ | दि. १२/०५/२००३ रोजी गैरअर्जदार दळवी यांचे कॉर्पोरेशन बॅंक,दादर,मुं. खाते क्र. एसबी/०१/०३२३४८ या खात्यावर रुपये ४५,०००/– रोखीने भरलेले आहेत. गैरअर्जदार व त्यांचे पत्नीचे नावे संयुक्त असलेल्या आयसीआयसीआय बॅंक,दादर,मुं खाते क्र. ००३२०१०२३६४७ या खात्यावर दिनांक ०१/०४/२००५ पासुन दिनांक ०८/११/२०१४ या कालावधीत एकुण रुपये ११,६८,९००/– एवढी रक्कम रोखीने भरलेल्या असल्याने सदरची रक्कम गैरअर्जदार यांचे मालमत्तेत गणण्यात आली आहे. | १२१३९०० |
| ४ | गैरअर्जदार गुलकंद दळवी यांनी त्यांचा प्लॅट क्र ६०४, एक्सर रोड बोरीवली (प) मुंबई ९२ सदरचा प्लॅट हा श्रीमती दिव्या झकाटीया व ओजस झकटीया यांना करारनाम्याव्दारे रुपये ७५०००००/– रकमेस दि. ०८/०३/२०१३ रोजी विकला असून सदरची रक्कम हि श्री. झकाटीया यांनी गैरअर्जदार गुलकंद दळवी यांच्या आयसीआयसीआय बॅंक दादर शाखेत धनादेशाव्दारे व आरटीजीएस व्दारे भरणा केल्याचे दिसून येते बॅंक स्टेटमेंटमध्ये निरीक्षण केले असता सदरची रक्कम हि रु. ८०००००/– ही श्री. झकाटीयांकडून जमा झाल्याचे दिसून येत आहे. म्हणून उर्वरीत फरकाची रक्कम ही गैरअर्जदार यांच्या मालमत्तेत गणण्यात येत आहे. | ५००००० |
| | एकूण मालमत्ता रक्कम | २१,९७,८६३ |

**<u>गैरअर्जदार गुलकंद दळवी यांची पत्नी माधुरी गुलकंद दळवी यांचे मालमत्तेचा तपशिल :–</u>**

| अ.नं. | तपशिल | रुपये |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार गुलकंद दळवी यांनी पत्नी माधुरी दळवी याचे नावे कासारवडवली, जि. ठाणे येथे रो हाऊस खरेदी करण्याकरीता श्री.तेजस देसाई व श्रीमती.चैतल देसाई यांना आयसीआयसीआय बॅंक दादर शाखेतुन धनादेशाव्दारे देण्यात आलेली रक्कम ७७,०५,६१८, मुद्राक शुल्क रू.४,६२,०००/– व नोंदणी शुल्क रू.३६,६४०/– सदरची रक्कम गैरअर्जदार यांनी केलेला खर्च | ८२,०४,२५८ |
| २ | गैरअर्जदार श्री. गुलकंद अविनाश दळवी यांची पत्नी नामे माधुरी दळवी यांनी अलीबाग,जि. रायगड येथे खरेदी केलेले ४ प्लॉट एकुण किंमत २२,९७,५०४/– सदरची जागा त्यांनी | ११,४८,७५२ |

समक्ष,

Dmello 22/10/18

( कॅलिस्टस डिमेलो )

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | भागीदार श्री. ककारीया यांनी मिळून घेतल्याने त्यांच्या हिश्यास रु. ११,४८,७५२/– रक्कम | |
| ३ | गैरअर्जदार श्री. गुलकंद दळवी यांची पत्नी नामे माधुरी दळवी यांचे कॉर्पोरेशन बँक, दादर या बँकेतील खाते क्र. एसबी/०१/०३४०३७ या खात्यात दि. ०३/०४/१६ रोजी रुपये १५९९४/– एवढी शिल्लक आहे. तसेच त्यांची मुलगी नामे दुर्वा हिचे त्याच बँकेत असलेल्या खाते क्र. एसबी/०१/०३५१७० या खात्यावर दिनांक ०२/०२/१६ रोजी १९००/– रुपये शिल्लक आहे. बँकेतील शिल्लक रक्कम एकुण रू.१७८९४/–आहे. | १७,८९४ |
| ४ | दि.०२/०४/२०१३ रोजी गैरअर्जदार यांची पत्नी माधुरी दळवी यांचे कॉर्पोरेशन बँक सेविंग खाते क्र.एबी/०१/०३४०३७ या खात्यावर रू. ४६२०००/– रोखीने भरून त्याच दिवशी स्टॉक होल्डींग कॉ.ऑफ इंडिया यांना रू.४६३०००/– रक्कम ट्रान्सफर करण्यात आलेली असल्याने सदरची रक्कम गैरअर्जदार दळवी यांचे मालमत्तेत गणण्यात आली आहे. | ४,६३,००० |
| ५ | दि.०४/०४/२०१३ रोजी गैरअर्जदार दळवी यांची पत्नी माधुरी दळवी यांनी कॉर्पोरेशन बँकेतुन माधुरी डि. यानावे अन्य बँकेत धनादेशाव्दारे रक्कम वळविण्यात आली आहे. म्हणुन सदरची रक्कम ही त्यांच्या मालमत्तेत गणण्यात आली आहे. | १,००,००० |
| ६ | गैरअर्जदार यांची मुलगी नामे दुर्वा गुलकंद दळवी यांचे कॉर्पोरेशन बँक खाते क्र. एसबी/०१/०३५१७० या खात्यावर दि.२९/०३/२०१० रोजी रू.६,८०,९४४/– हे कर्नाटक बँकतुन जमा झाले होते व सदरची रक्कम त्याच दिवशी चेक क्र.०२५५६२१ व्दारे एलआयसी यांना रू.६,००,०००/– भरणा करण्यात आली आहे. सदरच्या खात्याला वारस म्हणुन माधुरी गुलकंद दळवी असुन नमुद रक्कमही गैरअर्जदार यांच्या मालमत्तेमध्ये दर्शविण्यात आली आहे. | ६,८०,९४४ |
| | एकूण मालमत्ता | १,०६,१४,८४८ |

उघड चौकशीत प्राप्त केलेल्या पुरावा कागदपत्रांचे अवलोकन करता गैरअर्जदार गुलकंद दळवी व त्यांची पत्नी सौ.माधुरी गुलकंद दळवी यांचेकडे असलेल्या एकत्रित उत्पन्न, खर्च व मालमत्तेचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

अपसंपदेची गणना – श्री. गुलकंद अविनाश दळवी व त्याची पत्नी माधुरी गुलकंद दळवी

| अ. क्र | तपशिल | | | गैरअर्जदार गुलकंद दळवी | सौ.माधुरी गुलकंद दळवी (पत्नी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि.११/०८/१९९८ पुर्वीची मालमत्ता (विधान 'अ') | | | ०० | ०० |
| २ | दि.०७/०४/२०१६ रोजी परिक्षण कालावधी मधील मालमत्ता (विधान 'ब') | | | २१,९७,८६३ | १,०६,१४,८४८ |
| ३ | परिक्षण कालावधीतील एकुण मालमत्ता (ब–अ) | | | २१,९७,८६३ | १,०६,१४,८४८ |
| ४ | परिक्षण कालावधीतील एकुण खर्च (विधान 'ड') | | | ३३,१०,५२१ | ०० |
| ५ | परिक्षण कालावधीतील एकुण मालमत्ता व खर्च | | | ५५,०८,३८४ | १,०६,१४,८४८ |

समक्ष

22/10/18

( कॅलिस्टर्स डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ( ३ + ४) | | | | |
| ६ | परिक्षण कालावधीतील एकुण उत्पन्न (विधान 'क') | | | १,०१,०२,३९७ | ०० |
| ७ | अपसंपदा (५–६) | | | ४५,९४,०१३ (शिल्लक उत्पन्न) | १,०६,१४,८४८ (अपसंपदा) |
| ८ | एकुण अपसंपदा ( गैरअर्जदार + पत्नी) | | | ६०,२०,८३५ | |
| | अपसंपदा एकुण टक्केवारी = $\frac{DA}{Total\ Income} \times 100$ | | | ५९.५९% | |

यातील गैरअर्जदार श्री. गुलकंद अविनाश दळवी यांनी त्यांचे शासकीय सेवेतील उत्पन्न, त्यांनी त्यांचे व पत्नी नामे माधुरी दळवी यांचे नावे खरेदी केलेली वर नमूद मालमत्ता म्हणजेच त्याचे उत्पन्न व त्यांनी केलेला खर्च तसेच त्यांच्या मालमत्तेचा ताळेबंद पाहता गैरअर्जदार व त्यांची पत्नी यांचेकडे दिनांक ०७/०४/२०१६ पर्यतचा परिक्षण कालावधीमध्ये गैरअर्जदार गुलकंद दळवी यांचे रू.४५,९४,०१३/– (शिल्लक उत्पन्न) तसेच गैरअर्जदार यांची पत्नी माधुरी दळवी यांनी रू. १,०६,१४,८४८/– (अपसंपदा) एवढी मालमत्ता बाळगली असल्याचे निष्पन्न होते. गैरअर्जदार व त्यांच्या पत्नीचे उत्पन्न,खर्च व मालमत्ता एकत्रित केल्यास ती त्यांच्या उत्पन्ना पेक्षा ५९.५९ टक्के अपसंपदा निष्पन्न झालेली आहे. सदरची अपसंपदेची टक्केवारी १० टक्के पेक्षा जास्त असल्याचे उघड चौकशी दरम्यान निष्पन्न झालेले आहे.

गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी यांच्या उघड चौकशीत ते दिनांक ११/०८/१९९८ पासुन नोकरीस लागले असून त्यांनी त्यांच्या व पत्नीचे नावे वरील प्रमाणे मालमत्ता खरेदी केली आहे. गैरअर्जदार व त्यांची पत्नी यांनी सदर मालमत्तेबाबत ती मालमत्ता कशी खरेदी केली याबाबत जबाब देण्यास हजर रहात नसुन सहकार्य करीत नाही त्यामुळे माहीती उपलब्ध नाही.

सदरबाबत गैरअर्जदार यानां नैसर्गिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने आतापर्यत १० वेळा लेखी पत्र देवून चौकशी करीता त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रासह जबाब देणेकामी हजर राहण्याची समज देण्यात आली होती, परंतू गैरअर्जदार गुलकंद दळवी हे फक्त दोनवेळा हजर झाले सदरवेळी त्यांनी त्यांच्या बोरीवली येथील मालमत्तेचे तसेच कासारवडवली (ठाणे) येथील मालमत्तेचे कागदपत्रे जमा केली. तसेच त्यांच्या पत्नीचे नावे अलिबाग येथे असलेल्या जागाबाबत संगणकावरुन प्राप्त माहीती दिली आहे. तसेच त्या व्यतीरिक्त त्यांना वारंवार समज देवून देखील त्यांनी कोणतीही माहीती दिलेली नाही म्हणजेच माहीती देण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यांना शेवटचे पत्र दिनांक १८/१२/२०१७ रोजी देण्याकरीता आम्ही स्वत: त्यांच्या घरी गेलो असता त्यांना पत्र देवून हजर राहण्यास सांगितले असता

समक्ष,

22/10/18

( कॅलिस्टस डिमेलो )

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

त्यांनी आम्हास उडवाउडवीचे उत्तरे देवून त्यांचा चौकशीस सामोरे जाण्याचा इरादा नसल्याचे अप्रत्यक्षरित्या स्पष्ट केले.

गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी यांना दिनांक २०/०८/२०१६ रोजी पहिले पत्र देण्यात आले होते व दिनांक १८/१२/२०१७ रोजी शेवटचे अशी एकुण १० पत्रे देण्यात आली होती त्यापैकी ४ पत्रे ही अंमलदारांनी त्यांना त्यांच्या नमूद पत्यावर दिली होती तसेच आम्ही स्वत: २ पत्रे गैरअर्जदार दळवी यांना त्यांच्या रहात्या पत्यावर दिली होती. गैरअर्जदार दळवी व त्यांच्या पत्नीस सदर चौकशी व जबाब देण्यास हजर राहण्याची समज दिली. तसेच ते कर्तव्यास असलेल्या मा. उपकर निर्धारिक व संकलक (जकात) कार्यालय, बृहन्मुंबई महानगर पालीका, कांजुरमार्ग (पूर्व), मुंबई येथे प्रशासकीय अधिकारी यांना पत्रव्यवहार करुन गैरअर्जदार दळवी यांना चौकशीकरीता हजर ठेवण्याची समज देण्यास नमुद होते. सदरबाबत कांजुरमार्ग (पुर्व) येथील मनपा, कार्यालयाने गैरअर्जदार दळवी यांना दिनांक २८/११/२०१७ व दिनांक २४/०४/२०१८ रोजी पत्र पाठवून चौकशीकरीता लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी, मुंबई येथे हजर राहण्याची समज दिली होती. तसेच गैरअर्जदार गुलकंद दळवी यांचे सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगर पालीका, मुंबई यांना देखील पत्र पाठवून गैरअर्जदार दळवी यांना चौकशीकरीता हजर ठेवण्याबाबत कळविले होते, तरीही गैरअर्जदार दळवी हे चौकशीकरीता हजर राहिले नाहीत.

गैरअर्जदार गुलकंद दळवी यांनी चौकशी दरम्यान मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबाबतची दिलेल्या माहिती बाबत संबंधीत कार्यालये, वित्तीय संस्था व बॅका यांच्याशी पत्र व्यवहार करुन, त्यांच्याकडूनही माहिती प्राप्त करण्यात आली आहे. संबंधीत कार्यालय, वित्तीय संस्था व बॅका यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व गैरअर्जदार दळवी यांनी दिलेली माहिती यांची चौकशी करुन त्याचा खुलासा प्रत्येक मालमत्ता, उत्पन्न व खर्चामध्ये करण्यात आलेला आहे.

गैरअर्जदार गुलकंद दळवी यांनी वर नमूद केलेल्या मालमत्ता हया त्यांच्या नोकरीच्या कालावधीत खरेदी केल्या आहेत. गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी यांना नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने संधी मिळावी म्हणून सदर मालमत्ता खरेदी करण्याकरीता त्यांनी रक्कम कशी जमा केली याबाबत त्यांना जबाब देण्यास अथवा पुराव्याची कागदपत्रे सादर करण्यास वारंवार लेखी पत्राव्दारे कळवून देखील ते जबाब देण्याकरीता हजर राहण्यास टाळाटाळ करीत राहीले: यावरुन गैरअर्जदार गुलकंद दळवी यांना मालमत्तेबाबत काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात आले आहे.

उघड चौकशी मध्ये लोकसेवक नामे गुलकंद अविनाश दळवी, जकात निरीक्षक नेमणुक बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी लोकसेवक या नात्याने कर्तव्य बजावत असताना दिनांक ११/०८/१९९८ ते दिनांक ०७/०४/२०१६ या कालावधीत भ्रष्ट व गैरमार्गाने

समक्ष,
(signature) 22/10/18
( कॅलिस्टस डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

(signature)

Scanned by CamScanner

पत्नीचे उत्पन्न, खर्च व मालमत्ता एकत्रित केल्यास ती त्यांच्या उत्पन्ना पेक्षा ५९.५९% अपसंपदा निष्पन्न झालेली आहे. पतीने भ्रष्ट मार्गाने अपसंपदा मिळवली आहे हे माहित असून देखील ती जाणीवपुर्वक स्वत:च्या नावे धारण करुन ती कब्जात बाळगुन लोकसेवकाच्या नमुद गैरकृत्यास सहाय्य केल्याचे निष्पन्न होत आहे. तसेच गैरअर्जदार यांनी मिळविलेली अपसंपदा ही स्वत:चे नावे निष्पन्न होवून नुकसान होवू नये म्हणून मालमत्ता खरेदी करताना स्वत:च्या नावे असलेल्या जागा विकल्यानंतर मिळालेल्या उत्पन्नाने त्यांनी नविन खरेदी केलेल्या मालमत्ता हया आपल्या पत्नीच्या नावे हेतुपुरस्सर खरेदी केल्या आहेत. तसेच गैरअर्जदार यांची पत्नी नामे माधूरी गुलकंद दळवी यांचे कोणतेही दृष्य / कायदेशिर स्वरुपाचे उत्पन्नाचे साधन नसताना गैरअर्जदाराच्या अपसंपदेतून मिळविलेली मालमत्ता स्वत:च्या नावे धारण करुन ती कब्जात बाळगणे कामी गैरअर्जदार गुलकंद दळवी यांना सहाय्य केले आहे म्हणुन गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी यांची पत्नी सौ.माधुरी गुलकंद दळवी त्यांचेविरूध्द कलम १०९ भा.द.वि.सं. अन्वये माझी सरकारतर्फे फिर्याद असुन, गैरअर्जदार गुलकंद अविनाश दळवी व त्यांची पत्नी माधुरी गुलकंद दळवी यांच्यावर कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझी फिर्याद वाचुन पाहिली असता माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

22/10/18

( कॅलिस्टस डिमेलो )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

22/10/18

( विनोद कृ.पवार )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई

Scanned by CamScanner

COMMISSIONER OF POLICE
सत्यमेव जयते
MUMBAI
ANTI-CORRUPTION BUREAU
7900

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ... चौकशी अंतर त्वरीत ...
Reasons for delay in reporting by the Complainant/informant

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

...

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील को-या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील लोकसेवक गुलकंद अविनाश दळवी, जकात निरीक्षक बृहन्मुंबई महानगर पालीका मुंबई यांनी त्यांच्या सेवाकालावधीमध्ये दि. ११/८/९८ ते दि. ०१/४/१६ या परीक्षण कालावधीत त्यांच्या ज्ञात व कायदेशीर उत्पन्नाच्या साधनांशी विसंगत अशी ५९.५९ टक्के अशी अपसंपदा बाळगली म्हणून त्यांनी कलम १३(१)(ई) सह १३(२) भ्र.प्र.का. १९८८ अन्वये आणि त्यांची पत्नी सौ. माधुरी गुलकंद दळवी यांचे कोणतेही द्रव्य/कायदेशीर उत्पन्नाचे साधन नसतांना सदर अपसंपदा बाळगणेकामी प्रोत्साहन दिले म्हणून त्यांनी कलम १०९ भादवि अन्वये गुन्हा केला आहे वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

13. **केलेली कार्यवाही** .– 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ...

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ...

3. दुस-या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ... जिल्हा ... राज्य ...

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :

(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ... Rank ... No. ... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ... (3) Transferred to P. S. ... District ... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

22/10/18 PI

पोलीस ठाणे प्रभारी अधिका-याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name ...
पदनाम Rank ...
तपासिक अं. चा कोड क्र.
Posting
Coding No. of I. O. ...

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

15. १. न्यायालयात सादर केल्याची तारीख ...
1. Date and time of submitted to the Court

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.



Scanned by CamScanner